कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत "हुन्नर से रोजगार" योजनेकरीता नविन लेखाशिर्ष देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र कौविका-२०१२/(१६/१२)/व्यशि-५

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २० डिसेंबर, २०१२.

पहा:- १) पर्यटन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.3(20)/2011- CBSP, dated 5th September, 2011

२) मा.लेखापाल, मुंबई-२० यांचे पत्र क्र. TM/Ch.I/H&TED/UOR/1385, dated 23-11-2012.

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. कौशल्य विकास कार्यक्रम ही मा.पंतप्रधानांची अतिशय महत्वाकांक्षी योजना (Flagship Scheme) असून राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने ५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार राज्यस्तरावर सन २०२२ पर्यंत ४.५ कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मा.मुख्य सचिव महोदयांनी निश्चित केलेल्या KRA मध्ये कौशल्य विकास कार्यक्रमास अग्रस्थान देण्यात आले आहे.

२. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत पर्यटन विभागाच्या "हुन्नर से रोजगार" या योजनेची अंमलबजावणी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास यांच्यामार्फत करावयाचे प्रस्तावित आहे. या योजने नुसार राज्यात सहा विभागीय स्तरावर "फुड अन्ड ब्रेव्हरीज सर्व्हीसेस" व "फुड प्रॉडक्शन" हे दोन अभ्यासक्रम राबवावयाचे आहेत. सदरहू अभ्यासक्रम अनुक्रमे ६ व ८ आठवडयाचे असून त्याची ३० प्रवेश क्षमता असेल. याप्रमाणे ४ बॅचसच्या १२० विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात येणार आहे. सदर अभ्यासक्रम राज्यात मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, रत्नागिरी व पुणे येथे राबविण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर MTDC व SCVT यांच्याकडून विद्यार्थ्यांना संयुक्तरित्या प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

३. उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी केंद्रिय पर्यटन विभागाने दि. ५/९/२०११ च्या पत्रान्वये रु.१,५२,२५,१२०/- एवढ्या खर्चास मान्यता दिली असून रु.७६,१२,५६०/- इतका निधी राज्य शासनाच्या खाती जमा केला आहे. सदर रु.७६,१२,५६०/- इतका निधी मागणी क्रमांक डब्ल्यु-०४, २२३०, कामगार व सेवायोजन, ०३.प्रशिक्षण, १९९-अशासकीय संस्थांना सहाय्य, (०१)कौशल्य विकास कार्यक्रम, (०१)(०१) कौशल्य विकासासाठी राज्य व्यवस्थापन समिती (२२३० ५८५५) या लेखाशीर्षाखाली सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात योजनांतर्गत योजनेद्वारे नविन बाब क्र. ३४ म्हणून अर्थसंकल्पित करण्यात आला असून त्यास विभागाच्या दिनांक २१ मे २०१२ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदरहू निधी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात खर्ची पडण्यासाठी वितरीत करण्यासाठीचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला होता.

४. विभागाच्या उपरोक्त प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने केंद्र पुरस्कृत योजनेसाठी वेगळा संगणक सांकेतांक (CRC Code) घेणे आवश्यक असल्यामुळे विभागाने एक महिन्यामध्ये

कार्यवाही पूर्ण करावी या अटीच्या अधीन राहून रु.७६,१२,५६०/- इतक्या निधी वितरणाच्या प्रस्तावास सहमती दिली. त्यास अनुसरून नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत "हुन्नर से रोजगार" या योजनेसाठी नवीन उपशिर्ष देण्यासाठी प्रस्ताव मा.महालेखापाल, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

**शासन निर्णयः-** संदर्भ क्रमांक २ नुसार कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत "हुन्नर से रोजगार" या योजनेकरीता मा.महालेखापाल, मुंबई व वित्त विभाग यांनी खालील नविन लेखाशिर्षास मंजूरी दिली आहे.

मागणी क्रमांक डब्ल्यू-०४

२२३० - कामगार व सेवा योजन

०३ - प्रशिक्षण

१९९ - इतर अशासकीय संस्थांना सहाय्य.

०१ - कौशल्य विकास कार्यक्रम.

०२ - हुन्नर से रोजगार (१००% केंद्र पुरस्कृत योजना) (२२३० ५९२६)

२. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२१२२०१७३४५६८३०८ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सी.के.जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

मा. मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.अवर सचिव, पर्यटन मंत्रालय (एच.आर.डी. डिव्हिजन), भारत सरकार, नवी दिल्ली.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा.अपर मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग / पर्यटन यांचे स्वीय सहाय्यक.
मा.आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, मुंबई.अ
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन व्यशि-१,२,३,४ / साशि-२.
निवड नस्ती (व्यशि-५) ५ प्रती.